| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | करून व आरोपीने वाईट उद्देशाने फिर्यादी यांच्या ताब्यातून व फिर्यादीच्या संमतीविना चोरुन नेली, म्हणुन भा.द.वि कलम ३७९ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | |
| ०२. | आदेश काय ? | ...आरोपी विनादोषारोपमुक्त. |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र. ०१ करीताः –

**०५** अभियोगपक्षाने साक्षीदार क्र. ०१ फिर्यादी काशिनाथ शामराव जाधव यांना नि.क्र.१८ वर तपासले.

**०६** साक्षीदार क्र. ०१ फिर्यादी काशिनाथ शामराव जाधव यांनी साक्ष दिली की, ते आरोपीला ओळखत नाही. घटना ही दहा वर्षापूर्वी त्यांच्या शेतात रात्रीच्या वेळी कोयाळी येथे घडली होती. त्यांची म्हैस कोणीतरी चोरून नेली होती. त्यांनी कुणा विरूध्द रिपोर्ट दिला तसेच पोलीसांनी त्यांचे बयाण नोंदविले किंवा नाही ते आठवत नाही असे सांगितले. केवळ जबाणी रिपोर्ट नि.क्र.१६ व प्रथम खबरी अहवाल नि.क्र.१७ वरील सही ओळखल्याने त्यास सहीपुरता निशाणी क्रमांक देण्यात आला. वरील साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने सर्व साक्षीदारांना फितूर घोषित करुन उत्तरसूचक प्रश्न विचारण्यात आले असता सर्व साक्षीदारांनी नकारार्थी उत्तरे दिली.

**०७** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रकरण फार जुने आहे. कलम ३५६ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ नुसार भारतीय नागरिक सुरक्षा संहितेमध्ये किंवा इतर कोणत्याही कायद्यामध्ये काही असले तरी, जेव्हा फरारा घोषित आरोपी, संयुक्तिपणे आरोपी असो वा नसो, आरोपी खटल्यापासून

